-: प्रेसनोट दिनांक- २१/०५/२०२५ :-

**आरोपी लोकसेवक सागर पांडुरंग यादव, वय-४३, वनपाल वर्ग-३, परिमंडळ वन अधिकारी, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर रा. गणेश बंगला, रावजी मंगल कार्यालयासमोर, साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर मूळ रा. हासुर दुमाला, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी ५,०००/-रुपये लाचेची मागणी केलेबाबत...**

---

तक्रारदार हे शेतक-यांच्या शेतातील झाडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ता रुंदीकरणात बाधीत असणारी झाडे टेंडर मार्फत तोडणीसाठी घेवून ती विक्रीचा व्यवसाय करतात.

त्यासाठी वनखात्याकडे अर्ज सादर करुन आवश्यक असणारी परवानगी घेत असतात.आजरा तालुक्यातील राज्य हदद रस्ता क्र. प्रजिमा क्र. ६३ चे रस्ता रुंदीकरणाचे काम चालू असल्याने सदर रस्त्यात बाधीत होणारी झाडे तोडण्यासाठीचा लिलाव सार्वजनिक बांधकाम विभाग गडहिंग्लज यांचे मार्फत काढण्यास आलेला लिलाव अर्जदार यांना मिळाला आहे.

त्यामुळे अर्जदार यांनी वन परिक्षेत्र कार्यालय आजरा येथील बाधीत झाडे तोडण्यासाठी व वाहतुकीसाठी आवश्यक त्या कागद पत्रासह दिनांक २८/०४/२०२५ रोजी अर्ज केला होता. सदरचा अर्ज चौकशीकामी परिमंडळ वन अधिकारी कार्यालय गडहिंग्लज येथे आल्याचे समजल्याने तक्रारदार हे दिनांक २९/०४/२०२५ रोजी अर्जाचे पुढे काय झाले याची चौकशी करणेकरिता परिमंडळ वन अधिकारी कार्यालय, गडहिंग्लज येथे गेले असता तेथील वनपाल सागर यादव यांनी तुझ्या अर्जाची चौकशी करुन अहवाल मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यासाठी ६०००/-रुपये मला द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे ६०००/-रू ची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी ब्युरो, कोल्हापूर कार्यालयाकडे वनपाल सागर यादव हे लाच मागत असलेबाबात तक्रार दिली आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी प्रमाणे दिनांक २९/०४/२०२५ रोजी परिमंडळ वन अधिकारी गडहिंग्लज या ठिकाणी पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये सागर यादव यांनी तक्रारदार यांचेकडे स्वत:साठी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. गारदे यांना देणेकरिता ६,०००/-रुपयें लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५,०००/-रुपये ची लाच रक्कम देण्यास सांगितलेचे पडताळणीमध्ये निष्पन्न झालेने वनपाल सागर पांडुरंग यादव वय ४३, रा. साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर, मूळ रा.हासूर दुमाला, ता.करवीर, जि. कोल्हापूर यांना ताब्यात घेवून त्यांचे विरुध्द गडहिंग्लज पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याचे प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक श्रीमती आसमा मुल्ला, सहा.फौजदार-अजय चव्हाण, पोहेकॉ/सुनिल घोसाळकर, पोना/सचिन पाटील, पोना/संदिप पवार, पोकॉ/कृष्णा पाटील चालक स. फौज/गजानन कुराडे, चालक पोकॉ/प्रशांत दावणे अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्रीमती वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,**

**५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**